परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत जिल्हा परिषद कर्मचा-यांची जमा झालेली रक्कम राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेखाली वर्ग करण्यासाठी नवीन लेखाशिर्ष.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१६/प्र.क्र.४९/वित्त-५
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन इमारत
पहिला मजला, २५, मर्झबान पथ, फोर्ट मुंबई- ४००००१.
दिनांक-२८ सप्टेंबर,२०१७.

वाचा -

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१५/प्र.क्र.६२/वित्त-५, दिनांक १३, जून २०१७.
२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक अंनियो-२०१५/प्र.क्र.६२/वित्त-५, दिनांक ३१ जुलै,२०१७.

प्रस्तावना -

दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या व नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे सदस्य असलेल्या शासकीय कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्याचा निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियां-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ अन्वये राज्य शासनाने घेतला असून त्याबाबतची कार्यपध्दती वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१५/(NPS)/ प्र.क्र.३२/सेवा-४, दिनांक ६ एप्रिल, २०१५ अन्वये विहित केली आहे.

वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक ६ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयातील निर्देशानुसार या विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१५/प्र.क्र.६२/वित्त-५, दिनांक १३ जून, २०१७ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे सदस्य असलेल्या जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांना (शिक्षक वगळून) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) (स्तर-१) लागू करण्याची कार्यपध्दती विहित करण्यांत आली आहे.

जिल्हा परिषद कर्मचा-यांचा (शिक्षक वगळून) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समावेश होईल त्या तारखेपर्यन्त लेखाशिर्ष ८३४२-५१६-१ खाली जमा झालेल्या रकमा (कर्मचा-यांचे अंशदान) व लेखाशिर्ष ८३४२-५१०-५ खाली जमा झालेल्या रकमा (शासनाचा सममुल्य हिस्सा अधिक कर्मचा-यांचे अंशदान यावरील व्याज व शासनाचा सममुल्य हिस्सा) निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांचेकडून राज्य शासना करीता विश्वस्त बँक म्हणून नियुक्त झालेल्या ॲक्सिस (AXIS) बँकेकडे वर्ग करणे आवश्यक आहे. सदरच्या दोन्ही

लेखाशिर्षाखाली जमा झालेल्या रकमा विश्वस्त बँकेकडे वर्ग करण्यासाठी नविन लेखाशिर्ष मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे सदस्य असलेल्या जिल्हा परिषद कर्मचा-यांचा (शिक्षक वगळून) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समावेश होईल त्या तारखेपर्यंन्त लेखाशिर्ष ८३४२-५१६-१ खाली जमा झालेल्या रकमा (कर्मचा-यांचे अंशदान) व लेखाशिर्ष ८३४२-५१०-५ खाली जमा झालेल्या रकमा (शासनाचा सममुल्य हिस्सा अधिक कर्मचा-यांचे अंशदान यावरील व्याज व शासनाचा सममुल्य हिस्सा) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांचेकडून राज्य शासना करीता विश्वस्त बँक म्हणून नियुक्त झालेल्या ॲक्सिस (AXIS) बँकेकडे वर्ग करण्यासाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशिर्ष उघडण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत येत आहे

लेखाशिर्ष-

मराठी	**English**
मागणी क्रमांक एल-जी-९९	Demand No G-99
८३४२- इतर ठेवी	8342- Other Deposits
११७- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना	117- Defined Contribution Pension Scheme.
०० - परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना	००- Defined Contribution Pension Scheme.
(००)(०९)- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत जिल्हा परिषद कर्मचा-यांची जमा झालेली रक्कम राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेखाली वर्ग करणे. (८३४२०२०१)	(00)(09)- Depositing the amount recovered in respect of Zilla Parishad employees under Defined Contribution Pension Scheme in National Pension Scheme (83420201)

हा शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक १४४/अर्थ-२, दिनांक २.८.२०१७ तसेच महालेखापाल (लेखा व हकदारी)-१ महाराष्ट्र यांनी संदर्भ क्रमांक ख.वि/चा-१/ग्रा.वि.वि.ज.सं.वि./युओआर-३१/२०१७-१८/४६७ दिनांक २५.०७.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२८१११५२३१३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d9af780863a29e5ba66bbc39e6f9c1e31d9d4bbd5f5159dee9c14cf33ac34321, cn=Narayan Bhaskar Ringane
Date: 2017.09.28 16:10:54 +05'30'

ना.भा. रिंगणे
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित-

१) महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा)(लेखा व अनूज्ञेयता)
२) महालेखापाल महाराष्ट्र- २, नागपूर(लेखा परिक्षा) (लेखा व अनूज्ञेयता)
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी .
५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी .
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी .
७) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
८) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण नाशिक पुणे/ औरंगाबाद / अमरावती/ नागपूर.
९) संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) उप संचालक ,राज्य देखभाल अभिकरण ,नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना ,नवीन प्रशासकीय इमारत ,मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
११) वित्त विभाग, सेवा-४/व्यय-१५/अर्थ-१७, मंत्रालय, मुंबई.
१२) कार्यासन क्रमांक वित्त-१ /वित्त-४ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती वित्त-५.